**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण** सुधारीत

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/क.वि/२०१३-१४/५३/२१
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण
दिनांक :- ०३/०५/२०१८

सुधारीत बांधकाम परवानगी
(२८२५.०० चौ.मी. ह.वि.ह.क्षेत्रासह)

**श्री. दिपक हरिभाऊ तांदळे व इतर**
**कु.मु.प.धा.– श्री. जॉन मॅथ्यू व इतर**
**व्दारा – श्री. जॉन वर्गीस (वास्तु.) कल्याण (प.)**
**स्ट्रक्चरल इंजिनिअर– श्री. अजय महाले, ठाणे.**

विषय:– **स.नं. १६३, हि.नं. ३, ४, ६, ७, ९ब, मौजे–मांडा,** येथे सुधारीत बांधकाम करण्याच्या मंजूरीबाबत.

संदर्भ:–१) आपला दि. ०७/११/२०१७ रोजीचा श्री.जॉन वर्गीस (वास्तू.),कल्याण (प) यांचे मार्फत सादर केलेला अर्ज.
२) सुधारीत बांधकाम परवानगी क्र.कडोंमपा/नरवि/बांप/कवि/२०१३–१४/५३, दि.०७/०६/२०१३.
३) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला क्र.कडोंमपा/नरवि/सीसी/कवि/८७, दि.०७/०६/२०१३
४) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला क्र.कडोंमपा/नरवि/सीसी/कवि/३०७, दि.१४/०१/२०१५.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार **स.नं. १६३, हि.नं. ३, ४, ६, ७, ९ब, मौजे–मांडा** मध्ये **१५४६०.०० चौ.मी.** क्षेत्राच्या भुखंडावर **१२२६५.०५ चौ.मी.** क्षेत्राकरीता संदर्भ क्र.२ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी प्रदान करण्यांत आलेली आहे. यापैकी संदर्भ क्र. ३ अन्वये A9, A10, A11 या इमारतींना भाग बांधकाम पुर्णत्वाचा दाखला प्रदान करण्यात आलेला आहे. व संदर्भ क्र. ४ अन्वये A4, A5, A6, A7, A8 या इमारतींना भाग बांधकाम पुर्णत्वाचा दाखला प्रदान करण्यांत आलेला आहे. आता संदर्भ क्र. १ अन्वये आवेदकाने अपेक्षिल्यानुसार उर्वरीत इमारतींमध्ये काही नियोजनात्मक बदल करुन **२८२५.०० चौ.मी.** ह.वि.ह. क्षेत्रासह एकुण **७३९४.१४ चौ.मी.** चटई क्षेत्राचे बांधकामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ०७/११/२०१७ च्या अर्जास अनुसरुन उर्वरीत क्षेत्राचे बांधकामास पुढील अटी/शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे **रहिवास + वाणिज्य** इमारतीच्या बांधकामाबाबत, **''सुधारीत बांधकाम परवानगी''** देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटींवर **''सुधारीत बांधकाम परवानगी''** देण्यात येत आहे.

**इमारत टाईप A1 – स्टिल्ट(पै) + पहिला मजला ते सातवा मजला ( रहिवास )**
**इमारत टाईप A2 – स्टिल्ट(पै) + पहिला मजला ते सातवा मजला ( रहिवास )**
**इमारत टाईप A3 – स्टिल्ट(पै) + पहिला मजला ते सातवा मजला ( रहिवास )**
**इमारत टाईप B1 – स्टिल्ट(पै), तळ(पै) + पहिला मजला ते सातवा मजला ( रहिवास )**
**इमारत टाईप B2 – स्टिल्ट(पै), तळ(पै) + पहिला मजला ते पाचवा मजला ( रहिवास )**
**इमारत टाईप B3– स्टिल्ट(पै), तळ(पै) + पहिला मजला ते पाचवा मजला + सहावा मजला(पै.) (रहिवास + वाणिज्य)**

**सहाय्यक संचालक नगररचना,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

१) हे सुधारीत बांधकाम परवानगी दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल,नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम/विकास करण्यास हक्क देत नाही